अत्यन्त शांत असलेलं ते अरण्य सैन्यतील घोडदळ, रथदळ आणि पायदळ यांच्या प्रचंड आवाजानं जागं झालं. जंगलातील पशुपक्षी घाबरे झाले. सैरावैरा ते पळत सुटले. भयानक आवाजानं दाही दिशा कोंदाटून गेल्या. कांहीतरी विपरीत घडणार हे रामानं ओळखलं. ते सीतेला म्हणाले, आर्यस्त्रिये, तू भयभित होऊ नकोस. कदाचित थोडया वेळापूर्वी आलेल्या स्त्रिनेच हा चमत्कार घडवून आणला असेल. तिच्या मुळेच ही घटना घडून येणार आहे असे वाटते.

त्यावर लक्ष्मण म्हणाला, प्रिय बंधु, हा कसला आवाज आहे, हे पाहून येतो. कदाचित ज्याचा मृत्यु माझ्या हातून झाला आहे त्याचा कुणी नातलग आपल्याशी वैर साधण्यासाठी येत असावा. आपण इथे रहावे. माझ्याजवळ सूर्यहास खड्ग तर आहेच पण आपले मंगल आशीर्वादही आहेत. माझेवर संकट आले तर मी शंखानाद करीन तेंव्हा आपण आवश्य यावे.

नंतर तो सीतादेवीकडे वळून म्हणाला, हे आई, तू घाबरू नकोस. या पर्णकुटी भोवती मी ही रेखा आखुन देत आहे. याच्या पलीकडे तू जाऊ नकोस. या लक्ष्मणानं घातलेली रेखा ओलांडण्याची शक्ति कुणातहि नाही. तरी मी शत्रुंचा पराभव अवश्य करुन येईन. तू रामाबरोबर इथेच रहावे. माझ्या प्राणाची आपण दोघांनी काळजी करु नये. माझ्यामुळे निर्माण झालेल संकट दूर करण्याच सामर्थ्य आपण मला द्यावं. असं म्हणून दोघांच्याही चरणांना नमस्कार करुन लक्ष्मण जंगलाकडे वळाला. पाहातो तो काय? ज्यांना आकाशांत विहार करण्याची विद्या आत्मसात झाली आहे अशाप्रकारच्या शत्रुशी लढण्याचा दुर्धर प्रसंग त्याच्यावर आला होता. परंतु त्यानं खरदूषणाच्या सैन्याशी घनघोर युध्द केल. सूर्यहास खड्गाच्या सहाय्याने त्यान खरदूषणाच्या अर्ध्याअधिक सैन्याचा पाडाव केला.

तिकडे रावणाकडे गेलेल्या दूताने सर्व हकीकत रावणाला सांगितली. महापराक्रमी रावणाला अत्यंत राग आला. त्यानं पुष्पक विमान सजवलं आणि तो तडकाफडकी तेथे आला. पाहतो तर अलंकापुरी रिकामी होती. त्याला कळलं की, सर्व सैन्य दण्डकारण्यांत गेलं आहे. तोही विमानाने तिकडे निघाला. मार्गात त्याला सीतेचं सर्वमोहीरुप दिसलं. तिच्या रुपानं तो बेभान झाला. असली रुपसंपन्न कन्या इथं एका भिकारडया, वैभवहीन व्यक्तिबरोबर राहते याची त्याला किळस आली. हे सुंदर रत्न आपल्या सुवर्णानं मढविलेल्या लंकेच्या कोंदणांत शोभून दिसेल, असे त्याला वाटले.

रावण लंकेच्या राजा होता. त्यानं मनांत आणलेली प्रत्येक गोष्ट पूर्ण केली होती. स्वत: जिनभक्त असला तरी तो विद्याधर होता. पायानं चालणाऱ्या माणसाचा तो विद्वेष्टा होता. अनेंक देवांना दुर्लभ असलेले सौख्य त्यानं लंकेत निर्माण केलं होतं.

तो राक्षस कुळात जन्माला आला होता. याचा अर्थ असा नव्हता की, तो स्वत: राक्षस होता. त्याचा वंश तो होता. त्याच्या सुवर्णमुकुटावर राक्षसाचं चिन्ह होतं म्हणून त्यालाहि लोक राक्षस म्हणत.

त्यानं सीतेला पाहिल्याबरोबर त्याच्या मनांत पापवासना

त्यानं सीतेला पाहिल्याबरोबर त्याच्या मनांत पापवासना निर्माण झाली. ज्याला सर्व प्रकारचे सौख्य मिळत असते त्यालाहि असा मोहाचा क्षण येतो की त्याचं वैभव, त्याचं मानाचं स्थान त्याला कमी प्रतीचे वाटू लागतं. सीतेला पाहतांच त्या रावणाला स्वत:च्या सर्व मोठेपणाचा विसर पडला. सीतेच्या सौदर्यानं तो मोहित झाला. अत्यंत मोहाच्या क्षणी जे स्वत्व सांभाळतात तेच थोर होत. इतर थोरपण हे मोहानं जळून नष्ट होतं. रावणाच्या ह्रदयातील राक्षस जागा झ ाला. सीतेला पळवून नेलं तर कसं होईल? हा विचार तिच्या मनांत आला.

मग त्याने आपल्या विद्येच्या जोरावर हे जाणून घेतले की लक्ष्मण युध्दात गुंतला असून शंखाचा आवाज केला तर राम त्याच्या मदतीला धावून जाणार आहे. लगेच त्याने शंखाचा आवाज पुन: पुन: केला. त्यासरशी लक्ष्मणावर कांही संकट आहे हे जाणून राम सीतेला म्हणाला, आर्ये, तू इथं अंमळ थांब. लक्ष्मणावर आलेल्या संकटाचे निवारण करुन मी इतक्यात येतो. माझ या नांवाचे कवच तुझे संरक्षण अवश्य करील.

श्रीराम धनुष्य-बाण घेऊन धावतच युध्दाच्या भुमीकडे निघाले. भावाच्या अर्तरवाला जागणारा राम रावणाच्या माया शक्तीला ओळखू शकला नाही. मोहानं अभिभूत मन:प्रवृत्ति विवेकाला पारखी होते, हेच खरे.

इकडे सीता एकटी भयकातर होऊन राम जिकडे गेले होते त्या दिशेकडे पहात उभी होती तोच रावणाने आकाश मार्गाने येऊन सीतेला अलगद उचलून आपल्या रत्नमय विमानांत तिला बसविले. आणि तो आकांशात उडून दूरवर जाणार तोच सीतेचा आर्तस्वर जटायु पक्षाच्या कानी पडला. जटायु पक्षाने सीतेला हरण करणाऱ्या रावणाला पाहिले देहभान विसरुन त्याने रावणावर झेप टाकली.

भारतीय संस्कृतीत जणु तो संरक्षकच ! एका नारीचा होणारा अपमान, अवहेलना या हवेत वावरणाऱ्या, येथील अन्नपाण्यावर जगणाऱ्या पक्षांना देखील सहन होऊ शकत नाही. भारतीय संस्कृतीचे मांगल्य, दिव्यत्व ते हेच! यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता भारतीय संस्कृतीचे वैशिष्टय हे की, देव-देवतांना सुध्दा आकर्षण वाटावं असं कांहीतरी दिव्य इथं आहे.

जटायुनं सीतेची करुण अवस्था पाहिली. त्यानं रावणाचं सामर्थ्य पाहिलं नाही. अन्यायाचा प्रतिकार करतांना स्वत:च्या स्वत्वाकडे पाहावं, शत्रुच्या सामर्थ्याकडे पाहू नये असे म्हटले आहे ते खरेच आहे. दुसऱ्याच्या सामर्थ्याचा विचार म्हणजे आमच्या पौरुषाची खच्ची होय. त्या यत्:किश्चित पक्षानं त्रलोक्याला धाक बसविण्याऱ्या रावणाच्या शरीरावर इतके तिव्र आघात केले की, रावणाचा मुकुट खाली पडला. शरीरावरील कपडे फाटून अंग रक्तबंबाळ झाले. सीतेला सांभाळून उडून जाण्याच्या कल्पनेत हे तो विसरला की, हा देश कोणत्या संस्कृतीचा आहे.

रावणांन आपल्या तलवारीनं जटायुवर आघात करतांच पंख तुटलेला जटायु  राम, हे राम  असा आलाप करीत जमीनीवर पडला.  जणु भारतीय संस्कृतीचे हृदयच विव्हळ होऊन खाली पडले.

जटायु मनांत म्हणाला,  ज्यांनी माझं ममतेनं पालन केलं त्यांची सेवा करण्याची संधि चालून आली असतां मी कांहीच करु शकलो नाही.

जटायु खेदखिन्न झाला.  त्याच्या अंगातुन रक्त वाहत होते व डोळ्यातुन अश्रु.  रामाला ही वार्ता सांगावी असं त्याच्या मनांत होतं.  पण तोपर्यंत आपले प्राण शिल्लक राहतील कां? सीतेशिवाय रामाचं काय होईल या विचारानं तो अधिकच शोकाकुल झाला.

रणांगणात रामाला आलेले पाहून लक्ष्मण म्हणाले,  बंधुवर्या, सीतामातेला वनांत सोडून आपण इकडे कसे आलात?  ती आपल्या आश्रयाशिवाय किती भयभित झाली असेल ?

श्रीराम म्हणाले,  तुझा शंखनाद ऐकून मी आलो.  मला वाटले तुझे जीवित धोक्यात आहे म्हणून सीतेला सर्व सांगुन मी इथं आलो आहे.

तो म्हणाला,  तुम्ही आता परत जा.  मी एवढं युध्द जिंकून येतो.  श्रीराम तेथून तडक निघाले.  त्यांना मार्गात अशुभ शकून होत होते.  कांहीतरी वेडेवाकडे घडणार आहे याची रामाला कल्पना आली.

आपल्या पर्णकुटीजवळ आल्यावर  सीते!  अशी त्यांनी हाक मारली;  पण त्या सादाला प्रतिसाद मिळाला नाही.  सीता आपली गम्मत तर करीत नाही ना !  या कल्पनेनें तु पुन: म्हणाले, सीते ! ही वेळ गम्मत करायची नाही.  सांग तू कुठे लपली आहेस ?  पर्णकुटीतही ती नव्हती. जटायुही तेथे दिसला नाही.  श्रीराम घाबरुन गेले.

मग श्रीरामाच्या डोळ्यात आसवे उभी राहिली.  ते लहान मुलासारखे झाडांना, वेलीना विचारु लागले--

हे वृक्षानों, सीतेला तुम्ही कुठे पाहिलं का? तुमच्या सहवासांत ती किती सुखी होती? सांगा ना, तुम्ही सारे असे स्तब्ध का?

फिरतां फिरतां त्यांनी जटायु पडलेला पाहिला.  रामाला पहाताच सर्व शक्ती एकवटून त्यानं फडफड केली.  रामाला सर्व सांगण्याची त्यानं परकाष्ठा केली; पण व्यर्थ!  रामानं त्या मरणोन्मुख पक्षाच्या कानांत अत्यंत मांगल्यनिधी असलेला  णमोकार मंत्र  घातला.  पक्षानं प्राण सोडले.

रामानं कयास केली की, कुणीतरी जटायुला मारुन सीतेला पळवून नेली असेल.  सीतेच्या विरहाच्या कल्पनेने राम जमीनिवर मूर्च्छित होऊन पडले.

युध्दात गुंतलेल्या लक्ष्मणाने पाहिले की, ज्याच्याशी तो लढत आहे तो केवळ साधा माणूस नाही, विद्याधर आहे. अनेक प्रकारची अस्त्रे व शस्त्रे त्यांच्यामुळे तो आपणाला हार जात नाही. तुंबळ युध्द होऊनही सैन्याचा वेग वाढत होता. त्याचे मन राम इकडे निघून आल्यामुळे सीतेचे काय झाले असेल या विचाराने थोडेसे काबरेबावरे झाले होते. कधी हे युध्द संपते आणि सीतेसहित रामाला मी पाहतो एवढाच विचार त्याच्या मनात घिरटया घालीत होता.

इकडे युध्दाची धुमश्चक्री चालू असता त्या मार्गाने जाणाऱ्या विराधित नावाच्या विद्याधराने हे पाहिले. एकटा विर प्रचण्ड सैन्याशी सामना देताना त्याने आजच पाहिले होते. विराधिताला आनंद झाला अशा महामानवाला आपण मदत केली पाहिजे या विचाराने त्याने त्याची परवानगी घेतली व युध्दात सामील झाला. तो म्हणाला------

लक्ष्मणा, तू खरदूषणावर चालून जा. मी माझ्या सैन्यानिशी आकाशांतून लढणाऱ्या सैनिकांना पाहून घेतो. लक्ष्मणाला आनंद झाला. कर्म बलवान असलं की प्रत्यक्ष अरण्यांतहि मित्र सापडतात आणि नशीबात नसेल तर नरेंद्राचं सौख्यहि डोळ्यापुढे विलीन होतं.

श्रीलक्ष्मणानं खरदुषणाला ललकारलं. खरदुषणाला रथ लक्ष्मणाने आपल्या असंख्य बाणांनी छेदून टाकला व खाली पाडला. खरदूषण आणि लक्ष्मण आता जमिनीवर लढू लागले. लक्ष्मणाने क्षणाचाहि विलब न लावता सूर्यहास खड्गाने खरदूषणावर प्रहार केला त्यासरशी तो प्रचंड योध्दा जमिनीवर मरुन पडला.

प्रमुखाचा वध झाल्याबरोबर इतर सौनिकांनी आकाशातून पळ काढला. थोडयाच वेळात ते महायुध्द संपलं. लक्ष्मणाला विराधिताचे आभार मानायला वेळ होता कुठं? खरदुषण मेल्याबरोबर त्याने तात्काळ पर्णकुटीकडे आपला मोर्चा वळविला. तेथे येऊन पाहतो तो राम मुर्च्छित होऊन पडलेला. रामाच्या अश्रुनी भुमि ओलीचिंब झालेली! लक्ष्मणाच्या हृदयावर वज्रघात व्हावा तसे झाले. श्रीरामाची पवित्रकाया धरणीवर पडलेली पाहताच लक्ष्मणाचे हृदय विदीर्ण झाले.

श्रीराम शुध्दीवर आले ते हे सीते! अशा हाकेने. आपल्या अर्धांगीवर इतके निरपेक्ष प्रेम केल्यावर पतीने सतीत्वाची अपेक्षा का करु नये. प्रेम हेच या असार संसारातील एकमेव आकर्षण नव्हे काय ? हेच प्रेम परस्परांना निर्बंधाच्या बंधनात जखडू शकते. जेथे विकास स्वार्थी, लोलूपी प्रेम असते. तेथे सतीत्वाची अपेक्षा करणे चुक आहे. दिव्य जीवनाची वाटचाल प्रेमानेच करावी लागते. मांगल्याचे आश्रय स्थान प्रेमच नव्हे काय!

श्रीरामाने जेंव्हा अयोध्या नगरी सोडली, आईचे चरण सोडले वडीलांची ममता सोडली तेंव्हा त्यांच्या डोळ्यात असे अश्रू नव्हते. पण सीतेच्या वियोगानं ते दिड:मूढ, निश्चेतन झालेले रामच जणू बोलत होते.

लक्ष्मणानं रामाला स्पर्श केला.  श्रीरामांन त्याला मिठी मारली.  दोघांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागली.  या भयानक जंगलात सीतेचा शोध कसा करावा?  कुणी नेले असेल तिला?  कोणत्या आपत्तीत असेल ती? रामाच्या विरहानं तिचं अंत:करणं कसं शोकाकुल झालं असेल?  या विचारानं दोघेही हतबध्द झाले.

दु:खाची परंपराच अशी आहे!  दु:खाच्या सैन्याची हालचाल कळत नाही.  त्यांचा हल्ला कोणावर कसा होईल ते कळत नाही कदाचित संकटांनी मानवाची उंची वाढत असेल, त्यांच्या गुणांचा प्रकर्ष होत असेल, धैर्यशीलतेची व सहनशीलतेची कसोटी पहावयाची असेल म्हणूनच की काय ही दु:खे कधी चक्रवर्तीला, कधी तीर्थंकराला, कधी रामासारख्या शलाका पुरुषाला, कधी कृष्णासारख्या थोर व्यक्तिलाहि सोडीत नाहीत.

कांही वेळानंतर संग्राम आटोपून विराधित विद्याधर तेथे आला.  त्याला सर्व वृत्तांत कळाल्यावर तो म्हणाला,  प्रिय मित्रांनो, मी विद्याधर आहे.  माझ्या विद्येच्या बळावर मी सीतेचा शोध लावीन.  आपण असे शोकाकुल होऊ नका.  मी तुमचा मित्र झालो आहे.  तुमच्या दु:खात मी सहभागी होऊन ते हलके करण्याचा अवश्य प्रयत्न करीन.  ज्याच्या सैन्याचा आपण पराभव केला त्या खरदूषणाची अलंकारपूरी जवळच आहे.  आपण तेथे जाऊ या.  तेथे गेल्यावर आपणाला निवांतपणें राहता येईल.  अशांत मनानें केलेला विचार हा अविचारच होय.  त्याने ध्येयसिध्दी होण्याऐवजी कार्यनाशच होईल.

त्यानंतर आपल्या कांही विद्याधर मित्रांना उद्देशून तो म्हणाला,   हे प्रिय मित्रांनो, श्रीरामाची सीतादेवी कुणीतरी आकाशांतून हरण केली आहे.  तुम्ही आपआपल्या विमानात बसून उंचवर जाऊन कुणी दिसतो का याचा शोध घ्या.

अनेक विद्याधरानी आपआपल्या परीने विद्येच्या साहाय्याने विमाने तयार करुन सीतेच्या शोधासाठी उड्डाण केले.

त्यानंतर श्रीराम आणि श्रिलक्ष्मण त्या विराधित विद्याधराबरोबर अलंकापुरीत आले.  सर्व राजवाडा आणि गांवातील खरदुषणाचे मित्र गाव सोडून पळून गेले होते.  चंद्रनखादेखील लंकेला निघून गली होती.  उजाड झालेल्या त्या राजवाडयात त्यांनी प्रवेश केला.  गावातील अनेक लोकांनी वंदन केले.  ज्या राजवाडयात ते उतरले होते.  ती देवादिकांच्या विमानाप्रमाणे अत्यंत मनोहर होता.  रत्नखचिंत भिती, तोरणे, पताका यांनी सुशोभित होता.  जणु सर्व वैभवच त्या ठिकाणी राशीभूत झाले होते.

पण अशा त्या वैभवसंपन्न वाडयांत देखील रामाचे मन प्रसन्न झाले नाही.  त्यांच्या निश्वासातून   हाय सीते !  असे उद्‌गार बाहेर पडत होते.

सीतेला विमानांत घालून पळवून नेताना सीतेने आपल्या अंगावरील दागिने विमानांतून बाहेर फेकले,  त्यावरुन रामाला कदाचित कांही कळू शकेल अशी तिची समजूत होती. आकाशातून विमान जात असता रावण तिला म्हणाला,-----------

हे सुन्दर स्त्रिये, तू असा शोक का करतेस? ज्यांन इंद्रालाहि पराभूत केलं, अनेक देव-देवता ज्याच्या सेवेसाठी तत्पर असतात, अशा मी लंकाधिपती रावण आहे. सोन्याचं माढविलेल्या लंकेची तू पट्टराणी झाल्यावर तुला रामाची आठवण देखील होणार नाही. मी स्वत: कांही परस्त्रीचा अभिलाषी नाही. अनेंक विद्यांचा जाणकार मी रावण आहे. तुझ्या इच्छेशिवाय तुझा उपभोग घेण्याइतका मी नादान नाही.

सीतेनं म्हटंल, तू विद्याधर म्हणवतोस पण तुला जग काय म्हणेल या अत्यंत नीच कृत्याचं फळ तुला माझे राम जेव्हा देतील तेंव्हा तुझ्या या विद्या तुला कशा साथ देतील तेच मी पाहीन! तुझी सोन्यानी मढविलेली लंका, या तुझ्या पापाने काळी ठिक्कर झालेली मी पाहिन तेंव्हाच माझ्या या डोळ्यांचे पारणे फिटेल! सूर्य वंशाच्या, कुलाच्या शौर्य, पराक्रम, दानात, मोठेपणा, पुण्य हे सारेच पणाला लागले आहेत. एका पादचारी व्यक्तीने या आकाशगामी पुरुषाला आव्हान केले आहे. एका लहानशा चिमणीने गरुडाला पराभूत केलं आहे. एका ओढयानं महानदीला बाजूला सारलं आहे. एका तुच्छ रानफुलानं कमलिनीला तुच्छ लेखलं आहे.

मंदोदरी म्हणाली, हे असं काय झालं आहे तुम्हांला, तुमचा पराभव, तुमची निराशा ही मी आजच ऐकते आहे! तुमची इच्छा पूर्ण करण्यांत माझं कांही सहकार्य पाहिजे असेल तर घ्या. माझ्या या देहाचे तुम्ही स्वामी आहांत. मी कोणत्या प्रकारे तुम्हाला हवी आहे? तुमचं दु:ख मला पहावत नाही. तुमच्या चेहऱ्यावरील विचार मला सहन होत नाही. तुम्हाला चिंतेच्या महासागरांत मी पहिल्यांदाच पहात आहे. सांगा तरी की, काय घडलं आहे, असं की ज्यामुळे तुम्हाला हि अवस्था प्राप्त झाली आहे?

रावणानं विचार केला----हे काम वास्तविक स्त्रीयांचे आहे. सीतेचे मन वळविणे मंदोदरीला अधिक सुकर होईल. स्त्रीचे मन वळविण्यांत मंदोदरीला यश येईल. म्हणून तो अत्यंत शांतपणे तिला म्हणाला--------

मला जिवंत राहणे कठीण आहे. खरदूषणाच्या मदतीसाठी गेलो असतां एक स्त्रिरत्न माझ या डोळ्याना दिसले. ते रत्न मी घेऊन आलो आहे; पण तिचे माझ्यावर प्रेम नाही. तिने माझा धिक्कार केला. मला न जुमानऱ्यांची मी काय गत केली असती ते तुला माहित आहे. पण लाकूड फोडणारा भुंगा कमलदल भेदू शकत नाही. माझे मन सीतेवर आहे, तिचा उपभोग माझी पत्नी म्हणून, माझी सहचारी म्हणून घ्यावा अशी माझी इच्छा आहे.

तुला माहित आहे की मागे एकदा मी एका दिगंबर जैन मुनीजवळ अशीं प्रतिज्ञा केली होती की, कुणाहि स्त्रिच्या संमतिशिवाय तिचा उपभोग घेणार नाही. त्या प्रतिज्ञेवर स्थिर राहण्याचा आजवर प्रयत्न केला. रावणाचं ऐश्वर्य उपभोगण्यास मिळावं म्हणून हजारो विद्याधर स्त्रिया आजहि विवाहासाठी धडपडत असता एक सामान्य पादचारी स्त्री माझी विनंति मान्य करीत नाही यामुळे तर मी आणखिनच डिवचला गेलो आहे तू वाटेल ते करुन सीतेचे मन माझ यावर बसेल व ती लग्नास तयार होईल असे कर. करशील ना हे तू माझ्यासाठी?

नाथ!  इतकं ऐश्वर्य, इतकी विलासिता, इतकं सौदर्य आपल्या सेवेत नित्य असताना तुमचं मन एका सामान्य स्त्रिनं आकर्षित करावं ना !  ऐश्वर्याच्या उपभोगानं मनाला समाधान मिळतं हे खोटं नाही वाटत आपणाला?  तसंच या भोगाचं आहे.  हस्तस्पर्शानं कोमेजणारी कमळे त     ुम्ही पाहिली आहेत.  हजारो स्त्रियांची यौवने तुमच्या बलशाल शरीराला पुरली नाहीत. एकटया सीतेनं तुम्ही आनंदित व्हावं हे मला पटत नाही.

रावण चवताळून म्हणाला,   तुझ्याकडून उपदेश ऐकण्यासाठी मी आलो नाही.  केवळ पतीची आज्ञा म्हणून मी तुला विनंती केली होती.  तुला ते काम करता येत नसेल तर माझ्या समोरुन चालती हो.  रावणाची इच्छा हा लंकेच्या सर्वात मोठा नियम आहे.  त्याच्या इच्छेखातर तिन्ही लोकांतील सौख्य ओवाळून टाकावं लागलं तरी ते झाले पाहिजे.

नंतर रावणानं क्रोध आवरला त्यानं पाहिलं की, मंदोदरीच या कामासाठी योग्य आहे. त्यानं आवाज बदलला.  मन्दोदरीला विश्वासात घेतलं.  सीतेचं लंकेत असणं किती आवश्यक आहे, हे पटवून दिलं.  मन्दोदरी सर्व स्त्रियात सुन्दर होती एवढेच नाही तर ती विवेकी होती. पतीच्या कोणत्या इच्छांना मान द्यावा, कोणत्यांना देऊ नये हे ती जाणत होती.

केवळ रावणाची इच्छा म्हणूनच तिनं हे काम पत्करलं होतं.  नाशासाठी तू हे जे करीत आहेस, ते पाहून तुझे मंत्री, तुझे मित्र, तुझे सगे-सोयरे तुझा धिक्कार करतील.  बळाने एखादया स्त्रीच्या प्रेमाचा अपमान करणे यासारखी हीन आणि लज्जास्पद गोष्ठ नाही.  माझ्या अंगाला स्पर्श करशील तर माझ्या प्रेतालाच तुला स्पर्श करावा लागेल.

हे सारे ती थरथर कांपत बोलत होती.  तिच्या शरीराचा अणूरेणु रावणाच्या या महान पापाला विरोध करीत होता.

रावणाला सीता हवी होती;  पण इच्छेविरुध्द नको.  त्याच्याशी लग्न करण्याची, पट्टराणी बनण्याची संधि मिळावी म्हणून किती तरी सुन्दर स्त्रिया झुरत असत.  रावणाला सौदर्याचा तोटा नव्हता.  रावणाच्या पराक्रमाने त्याला उणं असं कांही नव्हतं;  पण विनाशकाल जवळ आल्यानंतर चांगल्या चांगल्याची शुध्द निघून जाते,  बुध्दीचा लोप होतो,  विवेकशक्ति काम देत नाही.  तीच रीत रावणाची झाली होती.

अशा प्रकारे सीतेला घेऊन जात असता सीता श्रीरामाच्या नांवाने आक्रोश करीत होती. तो आक्रोश रामजटी नांवाच्या विद्याधराने ऐकला.  कुणातरी स्त्रीलारावण पळवून नेत असल्याचे त्याने पाहिले.  तेव्हा त्याने रावणाला प्रतिकार करावा या कल्पनेने रावणाला ललकारलं. रावणानें विचार केला की, याच्याशी युध्द करण्यात वेळ घालविण्यांत कांही अर्थ नाही.  म्हणून त्याने विद्याधराचे विमान आपल्या विद्येच्या बळावर नष्ट केले आणि तो रामजटी अचानक समुद्रात कोसळला.

रावणाने झपाटयाने आपले विमान लंकेच्या दिशेकडे वळविले.

राजवाडयाबाहेर त्याचे अनेक भाऊ आणि सेनापति त्याला भेटायला उभे होते. त्यांच्या दृष्टिपंथात रावणाचे विमान येताच साऱ्यांनी जयजयकार केला. पण रावणाची चर्या आनन्दित झाली नव्हती. नेहमीप्रमाणे त्याने आपले विमान राजवाडयांच्या बाहेरील खास ठिकाणी न थांबवता ते आपल्या आवडत्या अशा देवारण्य नांवाच्या उद्यानांत थांबविले. विमान खाली उतरविताच सीता बाहेर आली आणि एका वृक्षाच्या सहाय्याने उभी राहिली.

रावण तिला म्हणाला, हे मूर्ख स्त्रिये ; रावण तुझ्या इच्छेसाठी सर्वस्वाचा त्याग करील. तुला तुझा राम जिवंत पाहिजे असला तर तो मिळेल. परंतु रावणाचे सारे वैभव डोळे भरुन पाहून घे. मग तुला वाटल्यास तुझी इच्छा कळव. तुझ्या सेवेतील या शेकडो दासी तुझ्या इच्छा पूर्ण करतील. मी पुनः तुझे सुन्दर मुख प्रसन्न झालेले पहायला येईन.

त्यानन्तर तेथील संरक्षिकांनी उद्देशून तो म्हणाला, या सुन्दर फुलाची काळजी घ्या. तिच्या इच्छेविरुध्द वागू नका.

असे सांगून तो तडक आपल्या महलात गेला. रावणाच्या मंत्रीगणाला फार वाईट वाटले. रावणाला कांहीतरी मनस्ताप झाला आहे याची कल्पना त्यांनी केली. पण रावणाचा मनस्ताप दूर करण्याची इच्छा असतानाहि कुणीहि त्याला भेटू शकला नाही.

ही वार्ता मंदोदरी नावाच्या अत्यंत शीलवती आणि आवडत्या राणीला कळाली. खरदूषणाला मदत करायला गेलेल्या रावणाला काय झाले असावे याचा अंदाज ती करु शकली नाही. स्त्रीचं चारित्र्य असं अनाकलनीय तसं पुरुषाचं मनहि अनाकलनीय असतं. ती दबतया पावलांनी रावणाच्या महलात गेली. रावण पहिल्यांदाच पराभूत मनस्थितीत तिनं पाहिला होता. इतका गुणवान, इतका पराक्रमी, इतका सौदर्यवान पति मंदोदरीला मिळाला होता हे तिचं भाग्य होतं. पतीच्या पराक्रमापुढं स्त्रिया आपलं सर्व विसरतात, स्त्रियांचा खरा उपभोग बलिष्ट लोकांनाच घेता येतो हेच खरे ! पौरुषहीन पतीची स्त्रियानी हेटाळणी करावी यात गैर ते काय?

मंदोदरीच्या पावलांचा आवाज ऐकून रावण तिला म्हणाला ये, प्रियतमे ये, तुझा लाडका रावण आज दीन झाला आहे. त्याचे खरं पाहिलं तर ते दौत्य पत्करनं स्त्रीधर्माच्या विरुध्द होतं. आपल्या पतीसाठी कुणा परक्या स्त्रीला तयार करायला स्त्रीचं मन तयार होत नसतं. त्यात एक प्रकारची वंचना असते. सतीत्वाची. स्त्रीत्वाची!

मंदोदरी कितीही झालं तरी एका श्रेष्ठ कुलातील विद्याधर कन्यका! पतीसाठी तिनं सीतेचं मन वळविण्याचं ठरविलं असलं तरी आतून तिचं मन तयार नव्हतं. केवळ भोगोपभोगात रमणाऱ्या विद्याधर जमाती आणि कर्तव्य व धर्म यांचे पालन करणाऱ्या जमाती यांच्या संस्कृतीच्या कल्पनेतच अन्तर होते.

रावणाची राज्यकारण कुशलता ही अधिकाधिक विद्येच्या साधनेवर अवलंबून होती. विविध प्रकारची शस्त्रे प्रगत करुन घेऊन भारतातील अविकसीत किंवा अर्धविकसीत जमातीवर स्वतःचे वर्चस्व त्याला गाजवावायाचे होते. धर्मानं आणि श्रध्देनं जैन असला तरी त्या धर्माचा

आणि श्रध्देचा मूळ आधार जी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य आणि अपरिग्रह ही तत्त्वे याचा त्याला विसर पडला होता. रावणांत पराकाष्टेचे सामर्थ्य निर्माण झाले होते हे खरे. पण सामर्थ्याला हवे असलेले मानव-प्रेमाचे अधिष्ठान नव्हते. तत्त्वज्ञानाची उच्चता कितीहि असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात ती तत्त्वे जोपर्यंत सामान्यांच्या हृदयापर्यंत जात नाहीत तोपर्यंत ते तत्त्वज्ञ ाान अपूर्ण असते.

लंकेची राज्यपध्दती सामर्थ्यावर उभी होती, पण भारतीयांची राज्यपध्दती मानवतेवर उभी होती. लंकेच्या राज्यपध्दतीचा परमविकास झाला असला तरी तेथे चालणारी सत्ता कोणत्याहि क्षणी लोकविनाशीरुप धारण करु शकत होती.

स्वत: मंदोदरीला रावणाच्या सामर्थ्याबद्दल आपुलकी वाटत असली तरी रावणाचं मन मानवापेक्षा अहंकारानं, अभिमानानं जास्त भरलेलं होतं. असा अहंकार ज्यावेळी राज्यकर्त्यांच्या मनांत निर्माण होतो तेथून त्या राज्याच्या अवकळेला सुरुवात होते.

रावणाची इच्छा हेच राज्याचं अधिष्ठान ठरलं तर हे राज्य मोडेल अशी भिती त्याच्या भावांनाहि वाटत होती. राजा कोणीहि असला तरी शेवटी राज्य जनतेच्या हितासाठी असतं, कल्याणासाठीच असतं, मांगल्यासाठी असतं, हे मात्र ज्या ज्या वेळी विसरलं जातं त्या त्या वेळी मोठमोठी राज्ये धुळीला मिळालेली असतात.

मंदोदरी सीतेजवळ गेली. जणु पावित्र्य मांगल्याला भेटायला आलं होतं. सीतेचं निष्पाप रुप पाहून मंदोदरी स्तिमित झाली. मंदोदरीचं रुप पाहून रावणाच्या आत्मघातकी वागणुकीचा सीतेला वीट आला. रावणाचे दौत्य करायला आलेली मंदोदरी मूक झाली. सीतेला अमंगल कल्पना कशी सांगणार ती? दोघांनी परस्परांचं कुशालक्षेम विचारलं. सीतेनं रावणाच्या अमानुषी वागणुकीवर कोरडे ओढले. रामासंबंधी तिचा तिव्र अनुराग पाहून मंदोदरीला स्वत:ची कीव आली. आपण रावणाची सहचारी होण्यांत फार मोठी चुक`ली आहे असे तिला वाटू लागलं. सीतेच्या दैदिप्यमान विचार सौंदर्यानं मंदोदरी उजळून निघाली. रामावरील तिच्या अनन्य भक्तिभावानं मंदोदरी मस्तकं विनम्र झाले.

यालाच पावित्र्य म्हणतात. ज्याच्या दर्शनान मन निर्मळ होत पवित्र्य, रावणाच्या मनांत ज्या अर्थी सीतेला पाहून विकार निर्माण झाले त्या अर्थी त्यांच्या अन्यायाचा चरमक्षण समीप आला असावा. ज्याक्षणी पतिव्रत्याला, पवित्र्याला असे अवाहान मिळ्ते त्यावेळी ते आपल्या दिव्य दाहकतेनं पापाला जाळून टाकते. रावणाच्या अहंकारावर सीतेनं जणु विजेचा प्रहार केला. सीतेच्या स्पर्शानं रावणाच्या मांगल्याला तडे जाणारच. सीतेच्या असामान्यय दीप्तीनं रावणाला अधिकारमदानं अलेली धुंदी पार उतरेल अशी कल्पना मंदोदरीलाहि आली. तिनं आपला तेथे येण्याचा हेतू सांगितला; पण भितभितच रावणाचा वर्णन केलं. पण संभ्रमावस्थेत. खरे म्हणजे मंदोदरी आता रावणाची सहचारी उरली नव्हती. ती सीतेची सावली बनली होती. सीतेचया रक्षणाची जबाबदारी तिनं घेतली.

लंकेत सीतेनं मिळविलेला हा पहिला विजय होता. मंदोदरीच्या मनांत रावणाच्या पापकृत्याबद्दल तिरस्कार तिनं निर्माण केला होता. मंदोदरीचं पावित्र्य सीतेनं स्वत:भोवती गुंतवून घेतलं होतं. तिला जाणीव होती की, रावण एवढयावर गप्प बसणार नाही. अनेक प्रकारच्या खोटया नाटया युक्त्या योजून तो आपली नारकी इच्छा पूर्ण करायला मागेपुढे पाहणार नाही.

मंदोदरी सीतेचं मन वळ्वायला आली होती. पण अखेर पावित्र्यापुढे तिचा हेतू सफल झाला नाही. म्हणून ती म्हणाली,--------

हे आर्य स्त्रिये, माझ्या पतिदेवाबद्दल मला घृणा वाटत नाही. त्यांनी जरी तुला इथे आणलं असलं तरी तुझी संमति मिळाल्याशिवाय केवळ मुर्खपणानं देखील ते तुझ्या शीलाला कलंकित करणार नाहीत. विद्याधरांना प्राप्त झालेल्या विद्येनं आपण सर्वाच्या सौख्याचे मालक आहोत अशी समजून त्यांची असते. तुम्ही लोक आमच्या येथे थट्टेचे विषय आहांत. आम्ही सिध्द केलेली विद्याच कदाचित या लंकापुरीचा नाश करील. पायांनी चालणारी, कंदमुळे, व्रतोपवास करणारी तुमची जमात आमच्याकडे तुच्छ समजली जाते.

सीता म्हणाली, हे खरे आहे तुमचे म्हणणे. आम्हाला तुमच्या सारख्या विद्या प्राप्त झाल्या नाहीत. आम्ही आकाशांत उडू शकत नाही. अनेक शरीरे धारण करु शकत नाही. माया नगरी निर्माण करु शकत नाही. पण तुम्ही सारे लंकावासी इतके सुन्दर, बलिष्ठ व विद्यवान असूनही साधी मानव-कल्याणकारी संस्कृति इथं नाही. विध्वंसाच्या विश्वासानं तुम्ही साऱ्या भरतखण्डाला दहशत घातली आहे; पण हे राज्य लयाला जाण्याची चिन्हे दिसत आहेत. रावणमहाराज ज्ञानी असल्याचं मी ऐकलं होतं. जैन धर्मावार त्यांची श्रध्दा तरवरीच्या धारेसारखी असल्याचं मला माहित होतं अनेक मुनीजनांचा आदर केल्याचांहि माझ्या वडिलांकडून कळालं होतं. पण वैभवानं तो कामाध झाला आहे. विद्युतमालेला स्पर्श करण्याचा वेडेपणा तो करीत आहे. ताई, तू सांग समजावून तुझ्या पतीला. त्यांच्यात विवेक जागृत असेल तर मला सन्मानानं रामाकडे ते पाठवून देतील. माझे राम त्यांच्या या विवेकाचं कौतुक करतील; पण असे न झाले तर अविवेकाच दावानल शांत करण्याचं सामर्थ्य त्यांच्या बाहुपाशात आहे. माझे दीर तू पाहिले नाहीत. त्यांच्या नेत्रतेजापुढे चन्द्र-सुर्यही फिके वाटतील. विनाश टाळावा म्हणून हे सारे सांगत आहे. रघुकुल हेहि जैनधर्मीय घराणे आहे. असा इतिहास लिहिला जाऊ नये की, दोन बलाढय जैन घराणी आपसात लढून लयाला गेली. एकटया सीतेपायी हा प्रचण्ड विनाश होणार असेल तर मी आजहि मृत्युला कवटाळीन; पण सीता वंध-मुक्त झाली पाहिजे. दास्पांत सीता मरण पावली हा मला कलंक आहे. सीतेचं तेज हरण करण्याचं सामग्रि त्रैलोक्यांतील एकाहि व्यक्तिला नाही. ताई, विनाश नको असेल तर तुझ्या रावणाला हा निरोप दे. सीता इथं एकटी नाही. सती कुठंच एकटी नसते. तिच्या आत्म्याच्या शुध्दतेनं सारं सामर्थ्य जागं होतं. सारी सत्-प्रवृत्ति जागी होते. सतीत्व उघडं पडत नाही. उघडं पडतं ते दंभ, अविवेक, अन्याय! मी माझ्या बचावानं बोलत आहे अस तू समजू नकोस. मी मरनांत आणीन तर या लंकेच्या कणन्कण चितेवर जळताना दाखवू शकेन. रावणाला विद्यांचा गर्व असेल तर मलाहि माझ्या शिलाचा गर्व आहे. अग्निकण लहान असला तरी प्रचण्ड कापसाच्या राशीला पुरेसा आहे.

मंदोदरीचे डोळे पाणावले. सीतेच्या वाणीने ती खरोखर वेडावली होती. सीतेचं दिव्य रुप शब्द साकार करीत होते. रावणाचं आत्मिक दारिद्रयच जणु तिनं उघडं करुन दाखविलं होतं. मंदोदरीनं तिला ह्दयाशी धरलं. ती म्हणाली-----

तू मला बहिणीसारखी आहे. तुझ्या सतीत्वाच्या विडंबनापूर्वी ही ताई मातीत मिसळलेली दिसेल. तुझ्यावर कसलंहि संकट येणार नाही, याची मी तुला खात्री देते.

एखाद्या पणतीनं सूर्याला दिलासा द्यावा त्याप्रमाणे ती बोलत राहिली होती.

दोन्ही जीव एकरुप झाले. सीता वयानं लहान होती पण ती अध्यात्मिक राज-संताची मुलगी होती. दिव्य-दाहक अशा आत्मतेजानं तिचा आत्मा उजळला गेला होता. जीवनाचं अंतर्बाहय दर्शन तिनं घेतलं होतं. म्हणूनच रामाच्या जीवनात स्वतःचे जीवन मिसळून देतानांहि ती रामाहून वेगळी राहिली होती.

सीतेचं सतीत्व आत्मनिष्ठ होतं. रामाच्या नांवावर अवलंबून असलेलं नव्हतं. तिच्या जीवनाला व्यापून असलेलं हे जे आध्यात्मिकतेचं कवच होतं तेच खरं व्यक्तिमत्व होतं. पति-पत्नीत्वाच्या संबंधाला उजाळा आणणारी दिव्य शक्ती सीतेजवळ होती. त्याच शक्तीनं तिनं लंकेला आव्हान दिलं होतं. रावणाच्या वैभवानं ती दिपली नव्हती. मोहरली नव्हती. उलट अखिल विश्वाला आपल्या पराक्रमानं, वैभवानं, सामर्थ्यानं वंद्य, अजिंक्य आणि आदरणिय रावणाला सीतेनं ललकारलं होतं. आत्म्याच्या दिव्यत्वावर श्रध्दा असणाऱ्यांनी दुष्टतेला, क्रोर्याला, अहंकाराला वश केल्याची उदाहरणं भारतीय संस्कृतीच्या इतिहासाता कांही थोडी थोडकी नाहीत. सीतेच्या नसानसांतून तेच रक्त सळसळत होतं. तारुण्याच्या ऐन भरात साम्रांज्याच्या सुखावर लाथ मारुन तिनं रामाचं दुःख ते आपलं दुःख मानलं होतं. रामाचं कर्तव्य ते आपलं कर्तव्य समजलं. रामाशी एकरुप झालेली युवती रावणांन लंकेत नेली याचाच अर्थ रावणाच्या सर्वनाशाची ती सुरुवात झाली. सतीचे ते दिव्यरुप केवळ माता म्हणून स्वीकारावे लागते. तिथे नम्र व्हावे लागते. वासनांचा वाराहि तिथे नसावा लागतो. असे घडले नाही तर सतीत्वाच्या वन्हीनं न्हालेली लंका पाहण्याचा योग येतो.

मंदोदरीनं पाहिलं की, सीता सामान्य स्त्री नाही. रावणाची इच्छा पूर्ण होण्याची मुळीच शक्यता नाही. तिच्यापुढे पेच-प्रसंगच निर्माण झाला. रावणाच्या स्वभावहि तिला माहित होता. रावणाची समजूत काढणे म्हणजे एखादया हट्टी मुलाशी गाठ पडण्यासारखे होते.

ती जेव्हा रावणाकडे परत गेली तेंव्हां रावणानं विचारले, काय झालं? झाली का सीता तयार ?

मंदोदरी म्हणाली , नाथ, तुम्ही असे उतावीळ बनू नका. परस्त्रियेला लग्नाला तयार करणे का सोपे असते? पुरुष जसा अपमान सहन करीत नाही तशा स्त्रिया सतीत्व सोडायला तयार होत नसतात ते काम तुम्ही माझ्यावर सोपवलं ना ? मग तुम्ही स्वस्थ रहा.

सीता काय बोलली हे रावणाला ऐकायचं होतं. सीतेच्या दिव्य देहाचा उपभोग घेण्याची त्याची इच्छा दिवसेंदिवस बळावत चालली होती. परंतु त्यानं एक व्रत घेतलं होतं--

----कुणाच्याहि स्त्रीच्या संमतीशिवाय तिचा उपभोग घ्यायचा नाही. हे व्रत कसोशिने पाळत आला होता. परंतु सीतेसारखा लावण्य उपभोगण्यासाठी व्रत सोडावं लागलं तरी तो मनाची तयारी करीत होता; पण त्याचे विवेकी मन त्याला संमती देत नव्हते.

अलंकापुरीत राम आणि लक्ष्मण येऊन राहिले खरे. पण त्यांचे मन तेथे रमले नाही. सीतेचा शोध घेऊन तिला परत आणणं हेच काम त्यांच्यापुढे होतं.

नाही म्हणायला एक गोष्ट चांगली झाली होती. ती ही की, रामाचा संबंध विद्याधर जमातीशी आला होता. कारण रावणाचा पराभव करायचा तर या लोकांचे सहकार्य घेणे अपरिहार्य होते. रावणानं सीतेला नेल्याचं जेव्हा रामजटी विद्याधरानं सांगितलं तेंव्हा मात्र एका अत्यंत पराक्रमी सम्राटाला तोंड द्यावं लागणार आहे याची कल्पना दोघांनाही आली होती.

अशांतच एक गोष्ट घडली.

सुग्रीव नांवाचा वानरवंशीय विद्याधर रामाकडे आला. सुग्रीवाला अडचणीत पाहून रामाने त्याला सर्व प्रकारची मदत केली व त्याला निष्किंधापुरीचं राज्य त्याला परत मिळवून दिलं.

सुग्रीवाला राज्य परत दिल्यानंतर सीतेच्या शोधाला अधिक जोर चढला. श्रीरामाचे मित्रत्व लाभल्यामुळे सुग्रीवाचे मन अधिक कार्यप्रवण झाले. त्यांनी आपल्या अनेक मित्राकडे आमंत्रणे पाठविली. त्यांत श्रीहनुमान यांनाहि पाचारण करण्यांत आले होते. अंजनादेवीचे एकुलते एक आपत्य होते तें. लग्नानंतर अंजनादेवीला त्यांच्या पतीने बारा वर्षे दूर ठेवलं होतं. परंतू तिने दु:खाची छटाही आपल्या चेहऱ्यावर येऊ दिली नाही. तिचाच पुत्र हनुमंत.

वडिलांच्या पराक्रमावर न जगता त्यानं स्वत:चं असं राज्य निर्माण केलं होतं. स्वत: अत्यंत सुन्दर----कामदेव असल्यामुळे स्वभावत:च अनेक विद्याधर त्याचे मित्र झाले असल्यास नवल ते काय? श्रीहनुमानाचे व्यक्तिमत्व आगळे होते. अन्यायाची चीड त्यांच्या मनांत उपजतच होती. वडिलांनी आईला जो त्रास दिला त्याचाच परिणाम असा झाला असावा.

रामणला अनेक युध्दात श्रीहनुमानाच्या वडिलांनी मदत केलेली होती अितकेच नव्हे तर दोन्ही घराण्यांत परस्पर प्रेमाचं आणि सहकार्याचे वातावरण होते.

सुग्रीव हा रामाच्या कृपेने संकटमुक्त झाला असला तरी रावणाबरोबर युध्द करावयाची पाळी आली आहे हे कळताच त्याला दहशत बसली होती. म्हणून सुग्रीव सुरुवातीला कांही दिवस रावणाशी युध्द करण्याचे टाळू लागला. पावसाळा तर संपला होता. शरद ऋतूतच युध्दाची तयारी करावी असा श्रीरामाचा मनोदय होता. परन्तु सुग्रीवाने चालविलेली चालढकल पाहून लक्ष्मणाला फारच राग आला.

तेंव्हा लक्ष्मणाने सुग्रीवाला गाठून विचारले, आम्ही पादचारी माणसे आहोत आणि तुमच्या सहकार्याशिवाय कांही होणार नाही असे आपणांला वाटते काय? युध्दाला लागणारी तयारी पूर्ण झाली असूनही आपण चालढकलीचे धोरण का स्वीकारीत आहात? श्रीरामानी सीतेच्या वियोगांत आपला देह सोडून दिल्यावर आपण सीतेचा शोध घेणार आहात काय? श्रीरामाच्या वेदना हया भरतखंडाच्या आहेत हे तुम्ही समजू शकणार नाही. तुम्ही विद्याधर असल्याने तुम्ही अनेक सुखाच्या उपभोगात तुम्ही रमून जाता. पण ज्यांच्या हृदयात कुल-शीलाची वेदना असते त्यांची हृदये अपमानाने, असहायतेने जळत असतात. हे सुग्रीवा, तुम्हांला सहकार्य द्यायचं नसेल तर स्पष्ट सांगा. आम्ही तुमच्या सहकार्याशिवाय हे युध्द घडवून आणू. क्षत्रियांना युध्दाची भीति नसते. अपमानापेक्षा मृत्यू त्यांना जवळचा वाटतो. म्हणूनच निर्वाणाची ही भाषा मी स्पष्ट विचारतो की, तुमच्या मनांत काय आहे हे स्पष्ट करुन मला सांगा.

सुग्रीवाला लक्ष्मणाचा तो अवतार पाहून थोडा राग आला परंतू राम-लक्ष्मणांनी त्याच्यावर केलेले उपकार थोर होते. म्हणून राग आवरुन तो म्हणाला,

प्रिय वत्सा, रावण हा बलाढय शत्रू आहे. त्याचे हजारो भाईबंद या भूतलावर विखूरलेले आहेत. स्वर्गातील देव-देवतांचीहि तो पर्वा करीत नाही. आमच्या कुळावर त्याने अनेक उपकार केलेले आहेत. अशा प्रसंगी विचार न करता त्याच्याशी युध्दाचा प्रसंग निर्माण करु नये. म्हणून मी थांबलो होतो. आपल्या वेदना मला कळत नाही असे नाही. पण सारे सामर्थ्य एकवटले तरी आमचा टिकाव लागेल की नाही याची मला शंका वाटत आहे.

ठीक आहे, सुग्रीवा, आम्ही जे वनांत आलो ते तुझे सहकार्य मिळेल म्हणून आलो नाही. रघुकुलातील रक्ताला दिलेले हे आव्हान आम्हाला स्विकारले पाहिजे. तुम्हाला आमच्या वेदना कळायच्या नाही. परदु:खाची शीतलता सर्व जगातच प्रसिध्द आहे. पण हे तुम्ही लक्षांत असू द्या की श्रीरामाची वाणी ही शेवटची असते. त्यांचा निर्णय शेवटचा असतो त्यांना हे जर कळाले की सुग्रीवाचे सहकार्य ही केवळ थाप आहे तर ते याच क्षणी प्रस्थान करतील. दिसायला आम्ही दोघे भाऊ दिसत असलो तरी आमच्या मागे आमच्या वंशाची पुण्याई आहे. मृत्युची आम्हांला तमा नाही. पण विद्याधरांच्या वंशाचाहि विच्छेद होईल हे आपण जाणून असा.

त्यावर सुग्रीव म्हणाला, आम्हांला एकच गोष्ट विचारायची आहे. येथून जवळच एक मोठी शिला आहे. प्रचण्ड शिला. तिचे नांव आहे सिध्द शिला. जो कोणी ती उचलेल त्याच्या हातूनच रावणाचा नाश होणार आहे असे मुनीवचन आहे. मुनीवचन जर खरे असेल तर आपणांपैकी कुणी न कुणी ती शिळा अवश्य उचलील. लक्ष्मणाने लगेच सांगितले की, कसलाहि प्रचंड शिळा असो मी ती उचलून दाखवितो. त्यानंतर श्रीराम व लक्ष्मण हे दोघे जाम्बुनद, सुग्रीव, विराधित, अर्कमाली, नील आणि नल यांच्या बरोबर त्या ठिकाणी गेले. तेथे ती शिळा होतीच.

एका सरोवराच्या उत्तरेला ती प्रचंड शिळा त्यांनी पाहिली त्या शिळेच्या परिक्षणासाठी अनेक असुर तेथे उपस्थित होते. त्या महापुरषांना पाहून त्यांनी त्यांना वंदन केले. लक्ष्मणाने शुध्द पाण्याने त्या शिळेचे प्रक्षालन केले. सरोवरातील कमले तिला अर्पण केली.

त्यानंतर त्यांनी  णमो अरिहंताणं  चा मंगल पाठ केला. अरिहंताची स्त्रोत्रे गायली. स्त्रोत्रे म्हटल्यावर श्रीरलक्ष्मणाने ती महाप्रचंड शिळा आपल्या बाहूंनी उचलली आणि जोराने खाली आदळली. तिचे शकेडो तुकडे झाले.

श्रीरामासहित साऱ्यांना अत्यंत आनंद झाला. श्रीरामाने लक्ष्मणाला ह्रदयाशी धरले. लक्ष्मणाने पराक्रमी बाहू पाहून रामाने त्याचे कौतूक केले.

हे पाहून मग विद्याधरांनी खात्री वाटली की, या दोन दिव्य पुरुषांच्या हातूनच रावणाचा वध होणार हे निश्चित.

तरी परंतू सर्वांचा सल्ला असा पडला की, प्रथम रावणाशी समोपचाराने वागून सीतेला परत आणावे. श्रीरामाने आपली संमत्ति दर्शविली.

ते म्हणाले,  रावणाला जर हे पटले की सीतेला सुखरुप परत करावे तर यासारखी राक्षस वंशाला फायदेशिर गोष्ट नाही. परंतू माझा असा कयास आहे की, विनाशाच्या वेळी अशी बुध्दी होणं कठीण आहे. रावणावर आपला विश्वास असेल तर शिष्ठाई करायला दूत पाठविण्यास माझी कांही हरकत नाही.

सुग्रीवाने हनुमाला आमंत्रण दिले होते. सुग्रीव हा हनुमानाचा सासरा लागत होता. सुग्रीवावर रामाने केलेल्या उपकाराचे प्रसंग ऐकून हनुमानाला फार बरे वाटले.

आणि त्याने सैन्य सुसज्ज केले व तो सुग्रीवाकडे यायला निघाला रावणनाशाच्या दिशेने सुग्रीवाने हे टाकलेले पहिले पाऊल होय.

श्रीहनुमान हे आकाशमार्गाने श्रीरामाजवळ आले. त्यांच्या आगमनाने सुग्रीवादिक विद्याधरांना फार आनंद झाला. श्रीरामाने हनुमानाला ह्रदयाशी धरले. जणू पावित्र्य आणि पराक्रम एकमेकांना भेटत होते.
हनुमानाचे कुशल विचारुन झाल्यावर श्रीरामांनी सर्व वृत्तांत त्यांना सांगितला. रामांची ती मिठ्ठास वाणी, त्यांनी केलेला त्याग, त्या तरुण वयात रघुकुलाची त्यांनी राखलेली लाज, सौन्दर्यदेवता सीतेची झालेली विटंबना वगैरे गोष्टींचा हनुमानाच्या मनावर फार परिणाम झाला. पूर्वजन्मीच्या ऋणानुबंधामुळ्च जणू काही हा गोतावळा इथं एक झाला होता. श्रीरामाच्या दर्शनाने अननुभूत आनंद त्याला झाला. रामासाठी वाटेल तो त्याग करावा असे त्याला वाटू लागले. शूर्पनखा जरी आप्तापैकी होती आणि तिच्या पतीचा जरी रामाने नाश केला होता तरी श्रीरामाबद्दल त्याला मुळीच राग आला नाही. रामाने केले ते उचित केले असे वाटू लागले.

श्रीहनुमंतानें सर्वाशी सल्ला-मसलत केली आणि सर्वानुमते त्याने रावणाशी बोलणी करावीत व सीतेला बहुसन्मानाने रामाला करावी, असा सल्ला द्यावा असे ठरले.

एके शुभदिनी पवनपुत्राने आकाशमार्गे उड्डाण केले. श्रीरामाने त्याला आशिर्वाद दिला. रामजटीने मार्गाने पवनपुत्र श्रीलंकेला जावयास निघाला. लंकेची यात्रा पवनपुत्राने पूर्वीहि केलेली होती.; पण त्यावेळी तो त्याचा मित्र म्हणून! पण आज त्याचे कार्य वेगळे होते. रावणांचा स्वभाव त्याला माहित होता. त्याच्या हट्टी स्वभावामुळे बिभिषण त्याच्याशी नाराज होता. त्याची मुलेहि रावणाशी अन्तस्थरित्या खूप नसत. परंतू रावणाची जरब मोठी होती. त्याने लंकेभोवती अनेक युक्त्या योजून गुढता निर्माण केली होती.

प्रवेश द्वारावर अत्यंत कुशल द्वारपालाची योजना केली होती. आकाशमार्गाने जर तट ओलांडून कुणी शिरेल तर त्याचा विध्वंस करण्याच्या येजना त्याने तटावर केलेल्या होत्या. त्याशिवाय भयानक राक्षसांचा पहाराहि त्याने अहोरात्र बसविला होता. चुकून जरी कुणी प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तरी त्याची मृत्यूशी गाठ पडत असे.

जातांना त्याला वाटेत आपल्या आजोबाचे राज्य लागले. त्याच्या आजोबाचे नांव राजे महेंद्र. हनुमानाची आई अंजना महेंद्राची मुलगी. हनुमान गर्भात असतांना तिला सासर सोडावे लागले होते. जेव्हां भटकत भटकत माहेरी आली तेव्हां महेंद्र राजाने देखील तिला घरी ठेवून घेतले नाही. उलट तिला दोष देवून हाकलून दिले. पित्याने देखील आपल्या मुलीला आश्रय देवू नये याचा हनुमानाला फार राग आला. आता त्याला वाटले की अजोबाची गम्मत करावी व मागील दु:खद घटनेची त्यांना आठवण करुन घ्यायची.

खरोखरच हनुमानासारख्या अत्यंत श्रेष्ठ व्यक्तीचे लहानपण अत्यंत हाल अपेष्टेत गेले. व्याभिचारीणी म्हणून माहेर आणि सासर यांच्या स्नेहाला अपात्र ठरलेली अंजना वनांत भटकत होती. कुणीही आसरा देत नव्हता. इकडे महिने पूर्ण होत आले होते. पोटात तर अत्यंत पराक्रमी मूल होते. सुर्यबिंबाला कवटाळावे असे डोहाळे तिला लागले होते. एका भयानक रात्री एका सिंहाच्या गुहेत हनुमान जन्माला आला होता. त्यावेळी अमितगति नावांच्या मुनींनी तिची समजूत काढली होती. हा मागील इतिहास हनुमानाला आईने सांगितला होता. त्यानंतर अद्यापि हनुमान आजोळी गेला नव्हता.

आज सुदैवाने त्याला आजोबाशी युध्द करुन मग गाठ घ्यावी अशी इच्छा निर्माण झाली. त्याने नगररक्षापैकी अनेकांना चांगला मार दिला आणि हे वृत्त राजास कळविण्यास पाठवून दिले. राजा आपलया सैन्यासह युध्द करावयाला आला. दोघांचे तुंबळ युध्द झाले. दोघेहि विद्याधर असल्यामुळे वेगवेगळ्या मंत्राच्या सहाय्याने एकमेकावर ते शस्त्रास्त्राचा वर्षाव करु लागले. अशा प्रकारे हे घनघोर युध्द चालू असतानांच हनुमानाने आजोबाच्या रक्षात एकदम उडी घेतली. व त्यांना आपल्या बाहुपाशात कवटाळले. आजोबांच्या मनांत संभ्रम निर्माण झाला. त्यांच्या हृदयातहि वात्सल्याचा प्रवाह निर्माण झाला. त्यांनी विचारले-- तू कोण? आणि एवढे युध्द का केलेस? आणि अशाप्रकारे प्रेमपूर्ण नेत्राने मला का पाहतोस?

तेंव्हा हनुमानाने विनयाने म्हटले, हे वंदनिय महापुरुषा मी आपला नातू श्रीशैल हनुमान ! आपल्या चरणी माझा नमस्कार.

आजोबांनी त्याला हृदयाशी कवटाळले आणि राजवाडयात नेले. तेथे त्याचा योग्य तो सन्मान करुन त्याचे अचानक येण्याचे कारण विचारले. रावणाने रामाच्या स्त्रीचे हरण करणे त्यांनाहि आवङले नाही. आणि हनुमानाला ते म्हणाले, हे आर्योत्तमा, तू ज्या कामासाठी निघाला आहे ते पूर्ण होणार आहे. पण हे लक्षात ठेव की, रावण हा अंत्यत चतुर आहे. तुला आपल्या मोहपाशांत आवळून तुझा नाश करायलाहि तो मागेपुढे पाहणार नाही. सामर्थ्य आणि अबाधि सत्ता यामुळे तो कामांध बनला आहे. अनेक विद्याधराच्या स्त्रियाच काय पण तपोवनांतील तपस्विनींनाहि त्याने भष्ट्र केले आहे. त्याच्या पापाचा घडा भरत आला असावा असेच मानले पाहिजे. श्रीरामाला जरी मी ओळखत नाही तरी परंतु दशरथाच्या पराक्रमाची ओळख आखिल भारतवसियांना आहे, तू लंकेला जा. आणि मी देखील माझी सेना आणि सेनापति रामाच्या मदतिला पाठवित आहे. अनाचाराचे हे पर्व केव्हां ना केव्हा संपलेच पाहिजे. सीतेच्या निमित्ताने जणू रावणाचा सर्वनाशच ओढवणार अशी चिन्हे मला दिसत आहेत.

हनुमानाने सर्वांचा यथायोग्य आदर करुन तेथून उड्डाण केले. शहरांतील सर्व स्त्रियांनी हनुमानाचे ते रुप अवलोकिले. असा पति आपणांला असता तर आपण सुखी झालो असतो अशी इच्छा त्या स्त्रियांच्या मनांत आली.

विमांनातून हिंडत हिंडत लंकेच्या दिशेने पवनपुत्र हनुमान जात होता. त्याच्या मनांत येत होंत-- इतका पराक्रमी रावण पण सीतेच्या सौंदर्याला तो बळी पडला. रावणाच्या अंत:पुरांत भरतखंडातील सर्व सौंदर्य एकवटलं होते. उपभोगाचं प्रचण्ड सामर्थ्यहि रावणाकडे होते. असे असतां भूमिवासियांची स्त्री पळवून नेण्याची कोण दुर्बुध्दि त्याला झाली होती! विनाशाची वेळ आली म्हणजे चांगल्या माणसाची बुध्दि नष्ट पावते हेच खरे. मानवाचे जीवन हे एक न उलगडणारे कोडे आहे. वैभवाच्या शिखरावर असणाऱ्यालाहि तेथे सुख मिळेलच असे नाही. जे भोगायला मिळाले नाही असे क्षुद्र सुखहि उपभोगण्याची आसक्ति मनांत निर्माण होते, तेच कदाचित् अध:पतनाचे कारण असेल. जे जे हवे वाटते ते ते अनायासे मिळत असते ते ते अनायासी मिळाल्यासारखे् वाटल्याने त्यात गोडी वाटत नाही. ही मनोरचनाच मानवाला दु:खाच्या खाईकडे ओढून नेत असावी. इष्ट वियोग आणि अनिष्ठ संयोगाने तो व्याकुळ होतो. स्वत: त्याचेहि जीवन असेच खडतर गेले होते. रुपवती आईचे यौवन १२ वर्षाच्या पति विरहानंतर अचानक फुलले होते. कुणालाच हे ठाऊक नव्हते. सासूलाच काय पण साऱ्यांना हे ठाऊक होते अंजनेला पतीने त्यागिले आहे. असे असतां तो एका रात्री येऊन गुप्तपणे तिला भेटेल यावर विश्वास ठेवणे शक्य नव्हते. पण त्यातूनच व्यभिचाराचा आळ तिच्यावर आला होता. राजकन्येचं रुपांतर वणवण भटकणाऱ्या असहाय अशा दीनपणात झालेलं होतं. पण तेहि दिवस संपले होते. पुनश्च अनेक विद्यांचा स्वामी तो बनला होता. कुठला राम आणि त्याची भार्या सीता! पण त्यासाठी तो आज आपल्या सहकारी रावणाला समजूतीच्या काही गोष्टी सांगायला निघाला होता.

असे विचार त्याच्या मनांत येत असतां त्याने विमानांतून खाली पाहिले तो एका वनास आग लागली होती. आणि कुणीतरी त्यात भस्म होणार अशी शंका त्याला आली. त्याचं मन दयेन द्रवलं. आपल्या विद्येच्या बळावर त्याने मेघवर्षाव केला आणि ती वनाची आग विझविली.

खाली उतरुन त्याने पाहिले तो दोन दिगंबर मुनी शांतपणे तपश्चर्या करीत होते. श्रीहनुमानाने त्यांना वंदन केले. त्यांच्या गुणांची स्त्रोत्रं गायिली. मुनीनीं त्याला आर्शिवाद दिला.

तेथून हनुमान निघाला तो थेट लंकेच्या सीमेवरच थांबला. युध्द होईल या भितीनं रावणाने प्रत्येक ठिकाणी सौनिकाची नियुक्ति केली होती. अनेक गुप्तचराकडून रोजच्या रोज नवीन वार्ता मिळवून योग्य खबरदारी तो घेत होता.

रावणाची सैन्य व्यवस्था अत्यंत चोख होती. विमान, रथं, अग्निबाण यांचे तर सहाय्य होतेंच; पण आपल्या विद्यांच्या मदतीने अनेक तऱ्हेची सहस्यमय यंत्रणा त्याने निर्माण केली होती. जिथे पाण्याने भरलेले तलाव वाटून जर कोणीस्नानाला जाईल तो तेथून येत नसे. प्रवेशद्वार समजून जर कुणी प्रवेश करील तर त्याची उडी नेमकी एखादया राक्षसाच्या मुखात पडावी. फुलांचा सुवास घेण्यासाठी जर कुंणी फूल तोडले तर त्याचे हात तेथेच चिकटून रहात. बसायला केलेल्या आसनांचीहि हीच रीत होती. चुकून जर कोणी अशा असनांवर बसला तर तो आसनांसहित दूर फेकला जाई व त्याची हाडे नरम होत, पिण्याला जर कुणी पाणी मागितले तर ते पाणी आतडयांचा दाह करुन त्यांचा नाश करीत. झाडावर लागलेली फळे कितीही सुंदर दिसत असली तरी ती खाताक्षणीच खाणारा त्यातील विषाने मरुन जात असे अशी मायानगरीच जणु त्याने निर्माण केली होती. राक्षसांची नेमणुकहि त्याने मोठया कौशल्याने केली होती. जागोजागी राक्षसांना वेगवेगळी रुपे देवून त्याची नियुक्ति केली होती. कांहींना रेड, काहींना भयंकर सर्प अशी रुपे देऊन सर्वत्र त्यांची रचना करुन ठेवली होती. त्यामुळे हनुमानाचा प्रवेश लंकेत सहजासहजी होणार नव्हता.

हनुमानाने पाहिले की, लंकेचा प्रत्येक तट म्हणजे मायानगरीचा नमूना आहे. अत्यंत सावधगिरीने त्याला वागणे क्रमप्राप्त होते. खऱ्याचा सामना करायला मनुष्याला जड जात नाही. पण खोटयाला तोंड देणे जमत नाही. चांगुलपणाचा पराभव इथेच होतो. जगांतील वक्रतेला जाणून घेतल्याशिवाय चांगुलपणाचा विजय होत नाही.

हनुमानाने सर्व विद्यांना स्मरू न णमोकार मंत्राचा पाठ म्हटला. अरिहंताच्या स्मरणाने काय सिध्द होत नाही? त्यानंतर एका अक्राळ विक्राळ दिसणाऱ्या राक्षसाच्या तोंडासारख्या-प्रवेश द्वारातून प्रवेश करतांच भयानक आवाजासरशी तो भयानक जबडा बंद झाला. आणि एक प्रचंड राक्षसाक्ष्या हसण्याचा प्रतिध्वनी आसमंतात पसरला. परंतु हनुमान सावध होता. त्याने त्या प्रचंण्ड राक्षसाचया शरीराच्या चिंधडया चिंधडया केल्या. त्या राक्षसाची माया पसरविणारी विद्या त्याने हरण केली. त्यासरशी तो राक्षस एखाद्या गोगलगायी सारखा शरण आला. पण हनुमानाने त्याची गय केली नाही. त्या वज्रमुख राक्षसाचा त्याने नाश केला. हे पाहतांच त्याची अत्यंत रुपवती पत्नी लंकासुंदरी तिथे आली आणि तिनं हनुमानाशी युध्द केलं. हनुमानाचे रुप पाहून ती लंकासुंदरी त्याला शरण आली. हनुमानानं तिला जवळ घेतलं आणि प्रेमपुर्वक आलिंगन देवून लंकेत सीता कुठे आहे, विभीषणाचे व रावणाचे कसे आहे, इत्यादि संपूर्ण बातमी काढून घेतली. लंकासुंदरीने निर्विघ्न सुटका व्हावी म्हणून झटण्याचे मान्य केले. लंकासुंदरीच्या समागमामुळे हनुमानाला फार आनंद झाला आणि तो विभीषणाकडे गेला.

हनुमानाला आलेला पाहून बिभिषणाला फार आनंद झाला. अंध:कारानंतर सूर्योदय व्हावा, भयंकर तापदायक ऊन पडल्यानंतर पावसाच्या सरी याव्यात त्याप्रमाणे त्याला वाटले. यावे कामदेव बिभिषण म्हणाला, आज इकडे कसे काय उगवलात ? कांही शुभवार्ता आणली आहे काय ? घरी सर्वांचे क्षेम तर आहे ना ?

त्यावर हनुमान म्हणाला, आमचे तर सारे क्षेम आहे पण दुसऱ्यांची बायको पळ्वून आणणऱ्यांचे क्षेम आहे कएि र्नाही हेच पाहण्यासाठी आलो होतो. केवळ विद्याधर आहांत म्हणून विद्येचया बळावर कुणाचीहि स्त्री पळ्वून आणायची, कुणाचेहि राज्य बळकावयाचे हे विद्याधरांना शोभून दिसते का? याच पापामुळे हि विद्याधरांची जमात रसातळाला जाईल असे आपणांस वाटत नाही काय?

बिभिषणाने ओळखले की, हनुमानाचे सारे सांगणे सीतेच्या हरणासंबंधी आहे. तसे पाहिले तर बिभीषणाने रावणाला या बाबतीत चार समजूतीच्या गोष्टी सांगितल्या होत्या. पण कामांध झालेल्यांना विवेक नसतो. विवेकाच्या अभावी चांगले वाईट जमजून घेण्याची शक्तीच नष्ट होते. चूक लहान असली तरी तिचे परिणाम दूरगामी फार अनिष्ट होतात हे सुरुवातीला लक्षांत येत नाही.

त्यावर बिभीषण म्हणाला--- मी माझ्यापरीने अनेकदा सांगण्याचा प्रयत्न केला. पण आपला हट्ट सोडायला रावण तयार नाही. पाहिजे तर मीहि तुमच्या बरोबर येतो. तुम्हीहि सांगून पहावे, तुमच्या वडीलाचे रावण परम मित्र आहेत. तुम्ही स्वत:हि त्यांना अनेक युध्दांत मदत केलेली आहे पाझर फुटला तर विद्याधर संस्कृतीचे रक्षण होईल. नाहीतर या संकटाने लकेचा विध्वंस होईल असे वाटते.

त्यानंतर कांही वेळानें पुन: बिभीषण म्हणाला---- आज अकरावा दिवस आहे. सीतेने अन्न घेतले नाही. कदाचित् रामाशिवाय जगणार नाही. तिचं आत्मसामर्थ्य थोर आहे. आमच्या विद्याधर संस्क.तीत हे कुठं? केवळ भौतिकतेच्या मागे लागून आम्ही आमचा सर्वनाश ओढवून घेणार की काय असे वाटते.

सीतेच्या अन्नत्यागाची गोष्ट ऐकून हनुमानाला फार दु:ख झालं. सीता कशी असेल या विचाराने तो दु:खी झाला. तो दु:खी झाला. म्हणून त्याने बिभिषणाचा निरोप घेतला व तडक प्रमदोद्यानात जिथे सीता होती त्या ठिकाणी आला.

ते उद्यान पाहून हनुमानाला अत्यंत आनंद झाला. त्याचा मन:स्पाप कांहिसा दूर झाला. हजारो वृक्षांच्या शितल छायेत वन नुसतं चन्दनाप्रमाणे शीतल होते. बहरलेल्या लताकुंजामुळे विशिष्ट प्रकारचा संमिश्र सुवास दरवळला होता. कुणीहि दु:ख विसरावे, विसावा घ्यावा असे ते वन पाहून हनुमानाच्या चित्तवृत्ति प्रफुल्लित झाल्या. तो सीतेचा शोध घेत इकडे तिकडे हिंडू लागला.

उपवासाने कृश झालेली, सतत नामाच्या नांवाचा उच्चार करणारी, उसासे टाकून दु:ख प्रगट करणारी, सीता त्याने पाहिली. जणु पावित्र्याचे-मांगलचे दर्शनच त्याला घडले होते. सीतेसारखी दिव्य स्त्री हनुमानाने यापूर्वी पाहिली होती-ती म्हणजे त्याची आई-अंजना-देवि. तिनेही पति त्यागाचे दु:ख अनुभवले होते. अनेक वर्षे दु:खाला सुख मानून ती जगली होती. हनुमानासाठी ती जगली होती. साऱ्या जगाला हे दाखवून देण्यासाठटी की स्त्री हि एक दिव्य शक्ति आहे. तिच्या मांगल्याने जग मंगल हाते, तिच्या आमांगल्याने जगाचे रुपांतर नरकांत होते. सीतेचे रुप पाहून त्याला आपल्या आईची आठवण होणे, साहजिकच होते. हनुमान कामदेव होता. सुन्दरातिसुन्दर त्याचे रुप होते. विलोभनीय एखादी माया असेल आणि मुद्याम फसविण्यासाठी मला पाठविले असेल, असे तिला वाटेल म्हणून एकदम सामोरे न जाता त्याने ओळख म्हणून आणलेली रामाची आंगठी सीतेसमोर टाकली.

समोर चकाकणारी वस्तु पाहून सीतेला आश्‍र्चय आणि भय देखील वाटले. राक्षस लोकांच्या मायानगरीत काय आणि केव्हां घडेल यांचा नेमच नव्हता. लंकेत्तील अनेक चमत्कार तिला गेल्या अकरा दिवसांत पहायला मिळाले होते, विद्येच्या बळावर तेथील विद्वान विद्याधरांनी वाटेल ते निर्माण केलेले होते. ज्ञानाचे ते आगळे स्वरुप सीतेला पाहिल्यांदाच पहायला मिळाले होते.

वडिलांच्या आध्यात्मिक प्रवृत्तित वाढलेल्या सीतेला या तऱ्हेच्या ज्ञानोपासनेची कीव आली होती. ज्याज्ञानातून सर्वाचे सुख निर्माण होणार नाही, संयमाचाहि तोल सुटेल, सत्यान्वेषांतूनहि जनकल्याणकारी दृष्टि निघून जाईल ते ज्ञानच नाही अशी तिची समजूत होती.

ज्ञानाची उपासना ही सुळावरची पोळी आहे असे तिचे वडिल तिला म्हणत ते तिला लंकेत्त आल्यावर दिसले होते.

माणुस माणुसकीला पारखा होईल, दयेचा अंशहि त्याच्या मनांत राहणार नाही. खोटया संवेदना आणि खोटया प्रेरणा हीच जीवनाची प्रतीके बनतील, असे ज्ञान संपादण्याचा हव्यास तिथे सुरु असलेला तिने पाहिला होता. शास्त्रस्त्रांची प्राप्ति करुन घेणे एवढेच ध्येय होते. इतर मानव जमातीवर शस्त्रास्त्रांच्या बळावर धाक जमविणे हेच त्यांचे इतिकर्तव्य होते. साऱ्या जगांतील वैभव गोळा करुन आणून लंकेत्त साठविण्याचा उद्योग रावणाने गेली अनेक वर्षे केला होता. कनक आणि कांता यांच्या जोडीला क्रुरतहि येते हे माणूस विसरतो. रावण स्वत:चा मोठेपणा विसरला होता. जैनतत्त्वे वैशिष्टय हे की, स्वत:ला जिंकणे हृदयांत उद्भवणाऱ्या क्रोधादि विकारांना जिंकणे. पण रावण ते विसरला होता. भौतिकतेने जीवनाचे प्रश्‍न सुटत नाहीत इकडे त्याचे दुर्लक्ष झाले होते. भारतीय जीवनांतील आर्थिक दारिद्रच त्याला दिसले होते. रामाकडे विमाने नाहीत, तो पादचारी आहे, वैभवहीन आहे, पित्यासाठी, खोटी वचने सत्य करण्यासाठी तो वनांत जातो हे सारे रावणाला वेडेपणाचे होते.

पण भारतीय जीवन आंतून समृध्द होतं, आंतून विकसीत होतं, हे त्याला दिसलं नाही. इक्ष्वाकु कुलांतील उन्नत जीवनाचे आदर्श त्याला दिसले नाहीत. जनकाची थोरवी त्याला

कळाली नाही. सीतेच्या मांगल्याची, पतिव्रत्याची त्याला कल्पना आली नाही. घाणीतच लोळणाऱ्याला कमलाची कोमलता आणि गुलाबाचा सुवास कसा ठाऊक असणार ?

सीतेने ती आंगठी उचलली. आणि मनांत कल्पिल्याप्रमाणे ती रामाचीच होती. रामाची आंगठी पाहून तिच्या चितवृत्ती बहरल्या. आनंदाच्या लहरी तिच्या निरागस चेहऱ्यावर विलसू लागल्या. पण तो आनंद फार वेळ टिकला नाही.

कदाचित रामाला या राक्षसांनी ठार केले नसेल ना ? अशी शंका तिच्या उरी उद्भूत झाली. तिचे नेत्र पाणावले. रामाला कांही इजा होणार नाही असे वाटत असूनही ती घाबरली होती. अतिस्नेहपूर्ण असलं की नाही नाही त्या कुशंका मनांत येतातच.

नंतर तिनं म्हटलं, ज्यानं ही आंगठी आणली असेल त्यानं प्रगट व्हावं गुप्तपणे केलेले दौत्य सफल होत नाही.

त्यानंतर हनुमानाने समोर येऊन सीतादेवीला नमस्कार केला आणि रामाचं कुशल सांगितलं. तो म्हणाला, इतकेच नव्हे तर राम तुम्हाला विसरलेले नाहीत. तुमच्या अपहरणाची गोष्ट ऐकून ते मूर्च्छित झाले होते. परंतु विराधित नावांच्या विद्याधराने त्यांना फार मदत केली. वंदनीय रामावर आलेले हे संकट केवळ त्यांचेच आहे असे नाही. साऱ्या विद्याधराच्या कुलनाशासाठी रावणाने ही चूक केली आहे असे वाटते. मी स्वत: रावणाला चांगला ओळखतो. आमच्या घराण्याने त्याला अनेक युध्दात मदत केलेली आहे. मी हे निश्चित सांगतो की रावण झालेंली आपली चुक दुरुस्त करुन अत्यंत सन्मानाने तुम्हालां रामाकडे पाठविलं. पण असे घडले नाही तर मात्र मी आपणांला असे वचन देतो की, लौकरात लौकर तुम्हाला सोडवून आम्ही नेवू. तसे पाहिले तर मी माझ्या विद्याच्या बळावर तुमची एका क्षणात सुटका करु शकतो. पण रामाची तशी आज्ञा नाही. केवळ तुमचा शोध घ्यावा आणि मग राम सांगतिल तसे करावे असा आमचा मानस आहे.

त्यावर महासती सीता म्हणाली, हे भद्र पुरुषा, तुमचे आमच्या वर फार उपकार आहेत. तुम्ही आपले सौख्य सोडून आमच्यासारख्या पादचारी माणसांच्या सेवेत उपस्थित झाला आहांत. तुमचे हें फार मोठे
ऋण आहे. तुम्ही आम्हांला देवू केलेलं सहाय्य हे वाया जाणार नाही, एवढेच मी सांगते.

त्यावर हनुमान म्हणाला, हे देवि, तुम्ही अकरा दिवसापासून अन्नपाण्याचा त्याग केला आहे. आज माझी विनंती म्हणून आपण श्री जिनेश्वराचं स्मरण करुन अन्नग्रहण करावे. त्यानंतर हनुमानाने तिला सुंदर सुंदर फळे तिला अपर्ण केली व सीतेनेहि ती फळे मोठया प्रेमाने खाल्ली. सीतेन जेवणांचा निश्चय केल्याची वार्ता लंकेत पसरली. रावणाला वाटलं की, सीतेनं त्याची विनंती मान्य केली असेल. अनेक दास दासी नानाप्रकारच्या भोज्यपदार्थाच्या थाळी घेऊन तेथे आल्या. लंकेत आनंदीआनंद झाला. रावणाच्या विजयाच्या भेरी वाजू लागल्या.

हनुमानाला वाटले हे कांही तरीच घडत आहे. आपण इथं आलो दौत्य करायला पण विपरीत घडत आहे. कुणी तरी विद्याधर गुप्त रीतीने आला आहे आणि तो सीतेला भेटत आहे याची वार्ता जेंव्हा रावणाला कळाली तेंव्हा रावणाचे पित्त खवळले. त्या विद्याधराला धरुन आणण्यासाठी रावणानें उद्यान-रक्षकाला आज्ञा केली. हजारों सैनिक हनुमानाच्या दिशेने धावंत गेले आणि फारच मोठा कोलाहल त्या उद्यानांत माजला.

सीता घाबरली. हनुमान तिला म्हणाला, हे सीते, तुम्ही घाबरु नका. एखादया सिंहावर हे राक्षसरुपी हत्ती क्षणातच मरुन पडतील. तुमचा काय निरोप मी रामाला सांगू तेवढे सांगा.

सीता म्हणाली, हे मित्रा, तू आज फार मोठे काम केले आहे. माझ्यावर केलेले उपकार मी कसे फेडू. रामाला सांगा, सीतेचे प्राण तुमच्या दर्शनाला आतुर आहेत. रामाच्या वियोगानं सीता अर्धमृत आहे. परन्तु हया वियोगाचं दु:ख मी त्यांच्या नामस्मरणानेच सहन करीत आहे.

सीतेची ती भयकातर वाणी पाहून हनुमानाला दया आली. त्याचेहि हृदय भरुन आले. त्याला वाटले हिला उचलून रामाकडे पोचती करावी. पण सीता त्या गोष्टीला सम्मति देणार नाही. रघुकुलाला हे शोभणार नाही. रावणाच्या विनाशाची ही संधी वाया जाणार नाही.

नंतर त्याने सीतेची परवानगी घेतली आणि तिला नमस्कार करुन म्हणाला, आणखिन कांही दिवस आपण हा त्रास सहन करावा. आम्ही वैभवाने आपली सुटका येथून घेऊन जाऊ. आपण शांत रहावे.

सीतेने त्याला निरोप दिला. त्यानंतर हनुमानाने त्या उद्यान रक्षकांच्या विनाशाला सुरुवात केली. अनेंक संरक्षकाचे प्राण हवेत उडाले. थोडया वेळापूर्वी सुंदर दिसणारा तो बगीचा उजाड दिसू लागला. एखादया रणक्षेत्रांचेच स्वरुप प्राप्त झाले. या निमित्ताने तरी रावणाला भेटून त्याच्या हृदयात विवेक जागृत करतां येईल अशी हनुमानाची खोटी समजूत झाली. विवेकभ्रष्टाचा अध:पात एका मार्गाने होत नसून तो शेकडो मार्गांनी होतो हे त्याला कळाले नाही. रावणाची धंदी उतरेल असा जोरदार तडाखा देणारी व्यक्ति त्याला भेटली नव्हती. कांही पर्यायच असे असतात की, जिथे विवेक म्हणजेच युध्द . युध्द टाळायला दोन्हीकडे समंजसपणा लागतो. हनुमानाने मनांत आणले असजे तर त्याने अनेक प्रकारे लंकेला छिन्न- विछिन्न केली असती . पण त्याचा मूळ हेजू रावणाचा उपमर्द करुन गर्वहरण करण्साचा होता. या निमित्ताने रावणाचा मनसुबा काय आहे याची शहनिशा त्याला करता आली असती.

रावणाने पाठविलेले अनेक वनसंरक्षक जेंव्हा मरुन पडू लागले आणि ही अज्ञात व्यक्ति वनाचा नाश करते आहे, हे पाहुन रावणने इंद्रजिताला पाठविले.

इंद्रजिताने पाहिले की समोरील व्यक्ति ही साधी नाही.मनात आणील तर अनेक चमत्कार करुन दाखविल. म्हणुन त्याने कपटाने नागपाश मंत्राने त्याला बांधून घे्तले. अर्थात् हमुमानाला त्याच्यावर उपाय सापडला नसतां असे नाही. पण अनायासे तो बध्द होतो आहे आणि रावणाच्या सन्मुख उपस्थित होण्याचे कार्यही पुर्ण होते आहे,म्हणुन त्याने तसे कांही केले नाही.

इंद्रजिताला वाटले की नागपाश मंत्रशक्तीने आपण एका फार मोठया शत्रुला धरुनआणले आहे.पण रावणासमोर उपस्थित होताच ती विद्या आपोआप गळून पडली. रावणासमोर त्याचा सहकारी,अंत्यत विश्वासपात्र मित्र उभा होता.

कोण हनुमान? आपण इथे यावेळी कसे? आणि आम्हांला न कळविता आमच्या नगरीतील आमची दुर्दशा करण्यास कां प्रवृत्त झालात? आपले सारे क्षेम तर आहे ना? - रावण म्हणाला.

त्यावर हनुमान म्हणाला, ज्ञानी पुरुषा मी आतांपर्यत असे मानीत होतो की, सर्व विद्याधरांत आपण सर्वश्रेष्ठ आहांत? कुबेरालाही लाज वाटेल अशी आपली धनराशी! अप्सरांची मुखे म्लान ठरतील इतक्या सुंदर स्त्रिया आपल्या सेवेला पराक्रमाची मीती तर त्रिखंडात गाजत आहे. विवेकाबद्दल तर अनेक राजे- महराजे, विद्याधर आणि देव- देवता आपली स्तुती करतात. मग असे असतां एका आर्य- स्त्रीला आपण उचलुन आणली. तिच्यावर आसक्त होऊन तिला पापाचराला प्रवृत्त करावं हे आपणाला शोभून कसं दिसतं? सीता ही सती आहे. अग्नीला साक्षी ठेवुन तिनं पतिव्रत्य स्वीकारलं आहे. आपल्या विद्याधरांच्या स्वैरप्रवृतीच्या अगदी उलट आहे त्यांची जीवन- पध्दती. शील हा त्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. आपणालां वाटलं असेल सीता ही आपल्या कामवासनेच्या पूर्तिसाठी जन्माला आली. पण तसे नाही हे लक्षात ठेवा. मला हे माहित नव्हतं की, तुमच्यासारख्या ज्ञानी पुरुषाकडुन ही राक्षसी कृति घडेल म्हणुन.

रावणाला राक्षस म्हटलेलं खपलं नाही. खरोखरच रावण हा अंत्यत चांगल्या प्रवृतीचा माणूस होता. परंतु-

यौवन धनं- संपत्ती प्रभुत्वं अविवेकिताा
एकेक्रमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ाा

यौवन, संपत्ती, प्रभुत्व आणि अविवेक यापैकी एक एक गोष्ट देखील अनर्थमय आहे. पण जिथे या चारही आहेत तिथे काय विचारावे?

याच उक्तीप्रमाणे रावणाची स्थिती झालेली होती. पण रावण उपदेश ऐकण्याच्या मन: स्थितीत नव्हता. कामांधता आणि दरिद्रता या आंधळ्या असतात. न वैदुष्यं न मानुष्यं, नाभिजात्यं, न सत्वाक् अशी त्यांची अवस्था होते. सर्व ज्ञान विकारवशतेच्या तीव्र पटलांनी आवृत्त होतं पण माणुसकी नष्ट होते. कुळाच्या थोरपणा नष्ट होतो, आणि सत्यं तर केव्हाच पळून जाते.

रावणाला अहंकाराची धुंदी जडली होती. त्याच्सा चांगुलपणा,त्यांची मानसिक शातंता, त्यांचा
ज्ञानीपणा हे सारे त्याला सोडून गेले होते.

रावणाला हनुमानाच्या उपदेशाच्या राग आला. तो म्हणाला, अरे, तू तर माझा मित्र म्हणवतोस आणि मदत कारतो पादचारीना! ज्यांच्या जवळ काहीच नाही अशा भिका-यांना तू चांगला म्हणतोस. तू जिला सती म्हणतोस ती काही दिवसांनी माझी राणी होते की नाही पहा! भिकारी पति सुंदर कितीही असला तरी त्याच्याशी ती एक निष्ठ कशी राहिल माझे हे वैभव पाहुन. अद्यापी तिने रावणाचे वैभव पाहिलेच काय आहे?
रत्नमाणकांनी भरलेली माझी कोठरे, माझ्याकडे असलेली देशोदेशींची स्त्री- रत्ने, माझ्या दिमतीला असलेले सैन्य, पाहील तर अयोध्योलाच कास पण स्वर्गात जायला देखील ती होय म्हणणार नाही; पण आता तू साथीदार झाला आहे ना रामाचा? ठीक आहे. असल्या छपन्न विद्याधरांची संघटना केली तरी रावणाचा बालाहि बांका करण्याचे सामर्थ्य तुमच्यांत नाही.

हनुमान म्हणाला, लंकाधिपती, आपला विवेकच हरपला आहे. सारासार विवेकच गेल्यावर लंकेचे राज्य जायला काय वेळ लागणार? पण हे आपण लक्षात ठेवावे की, राम-लक्ष्मण साधे पादचारी नाहीत. आपल्या आत्मबळावर पृथ्वीलाहि नमविण्याचे सामर्थ्य त्यांच्याकडे आहे. सामर्थ्य शस्त्रबळात असते हे थोडेसे खरे असले तरी ते अंतिम स्वरुपाचे सत्य नाही. तुमच्या वंशाचा नाश करण्याचे सामर्थ्य त्यांच्याकडे आहे. योग्य वेळ येतांच तेहि लंकेत प्रवेश करतील हे आपण लक्षात ठेवावे.

रावणाजवळ बिभिषण होता. त्यानेहि हनुमानाचीच बाजू घेतली. तो म्हणाला, महाराज, आपण विद्याधर आहांत जैन कुलांत जन्माला आलेले आहांत, परस्त्रियांना मातेसमान मानणारे आहांत. सारे त्रिखंड जिंकण्याचे तुमचे सामर्थ्य विकार जिंकायला अपुरे पडत आहे. तुम्हांला आठवते, मागे मिच दशरथाचा नाश करावा म्हणून अयोध्येला गेलो होतो. कुणीतरी सांगितले होते की रघुकुलातील माणसामुळे रावणवंशाचा क्षय होईल म्हणून. आपलीच आज्ञा म्हणून रघुकुलाचा मुळापासून नाश व्हावा म्हणून मी माझे सर्व शहाणपण पणाला लावले होते. पण असे दिसले की, रघुकुलांतील माणसाकडूनच आपला नाश होणार आहे. माझी आपणाला विनंती आहे की, आपण आपले मित्र श्री हनुमान यांचे ऐकावे. त्यांनी दिलेला सल्ला आपणाला मागेही उपयोगी पडला आहे. श्री हनुमानाच्या मदतीने राम रावणकुलाचा नाश करतील. आपणांपुढे दोनच मार्ग आहेत. पहिला म्हणजे अत्यंत सन्मानाने माता सीतेला परत पाठविणे व दुसरा म्हणजे सर्वनाश ओढावून घेणे.

पण बिभिषणाने दिलेला हा बहुमोल सल्ला रावणाला आवडला नाही. त्याचा संताप अनावर णाला. त्याने बिभिषणाला नाही नाही त्या शिव्या दिल्या आणि तोंड काळे करायला सांगितले. बिभिषण लज्जित झाला. अपमानित झाला काय करावे हेच त्याला सुचेना.

हनुमानाने पाहिले की, आता इथे थांबणे उचित नाही. म्हणून तो रवणाला म्हणाला, माझे काम झाले आहे. आपण थोर आहांत पण ती थोरवी टिकविण्याला लागणारी सुबुध्दी मात्र आपणांकडे नाही. आम्ही कांहीच दिवसांत लंकेवर चढाई करु आणि मग मात्र आम्हांला दोष देऊ नका.

रावण संतापून म्हणाला, अरे पवनपुत्रा, तू मला शहानपण शिकवतोस काय? तुझ्या कुलगोत्राचा तरी पत्ता तुला माहित आहे काय? तुझ्या वडिलांनी तुझ्या आईला बारा वर्षे दूर ठेवले होते. लग्नापूर्वी अंजनेला महायला गेले असता तिथे तिच्या मैत्रिणीनी केलेली निंदा सहन न झाल्याने त्यांनी तुझ्या आईला टाकले होते आणि मग बारा वर्षांनी अचानकपणे त्यांना तिची आठवण आली. बारा बर्षांनंतर ते तिला भेटले; त्यावेळी ती परित्यक्त्या होती. माहेरी देखील तिला कोणी आश्रय दिला नव्हता. सासरच्या माणसानी तर तू गर्भात असतांना तिला घराबाहेर काढले होते. अशा दयनीय परिस्थितीत जन्माला आलेल्या, गिरिकंद्रात वाढलेल्या हनुमानानें मला शहानपणा शिवविण्याचे कारण नाही. रावण उपभोगासाठी निर्माण झाला आहे. जगातील सर्व चांगल्या चांगल्या वस्तु रावणासाठी आहेत हे तू समजून घे. हनुमाना, त्या रामाच्या पाशांत तू कसा काय अडकलाल हे मला माहित नाही. परन्तु तुझ्यासारख्या कामदेवाला रामात काय दिसले? रामासारख्या तुच्छ संस्कृतीच्या माणसांच्या नादी तु लागला, यावरुनच तुझ्या बुध्दीची

चमक दिसून येते. रावण तुझ्यासारख्या निर्बुध्द माणसाच्या सल्ल्याप्रमाणे वागेल हे तुला वाटवेच कसे? तुझ्यासारखे छपन्न विद्याधर जरी माझ्याविरुध्द उभे ठाकले तरी माझे काहीच वाईट होणार नाही. सीतेला मी माझी पत्नी बनविणार आहे. तिला मी आणतांना जरी कपटाने आणले असले तरी तिचा उपभोग मात्र मी कपटाने घेणार नाही! तुला माहित आहे की, मी कपटविद्येत प्रवीण आहे. रामाची एकच काय पण हजारो रुपे धारण करुन मी सीतेला वेड लावू शकतो. पण मी तू समजतोस तसा कामांध नाही. सीतेच्या विषयीचे माझे आकर्षण आजचे नाही. जन्मोजन्मीचे आहे. त्याशिवाय कां मी सर्वनाशाच्या खाईत उतरायला तयार झालो आहे. रावणाचा सर्वनाश करणारे स्त्री-रत्न जन्माला आले आहे हे मी नव्याने ऐकत नाही; पण मलाहि ते हवे आहे. माझे मरणच जर त्या निमित्ताने असेल तर मीहि त्या मरणाला तयार आहे. पण हनुमाना हे दौत्य तू पत्करावे याचे मला मात्र वाईट वाटले. तू जरी विद्याधर असला तरी तुझ्या खऱ्या कुलाचा पत्ता नाही.

रावणानं कुल-शीलाची केलेली चेष्टा हनुमानाला अवाडली नाही. त्यानं पुनश्च रावणाचा धिक्कार केला व सीतेची शेवटची भेट घेऊन व भेट झाल्याबद्दलची खूण म्हणून सीतेच्या हातातील रामाला असलेला चुडा घेऊन तो परतला. रावणाच्या दुष्ट शब्दांनी दु:खित होऊन जरी हनुमान परतला असला तरी पंरतु त्याला हे बरे वाटले की आपण सीतेचा शोध लावूं शकलो. सीतेला भेटूं शकलो. रामाच्या जीवनाशी त्याने आपल्या जीवनाची तुलना केली.

रामाच्या वनवासानंतर तिकडे वडीलांनी किती यातना सहन कराव्या लागल्या असतील या विचारानं हनुमानाला फार दु:ख वाटले. इतक्या लहान वयात राम-लक्ष्मणाला हा त्रास सहन करावा लागावा, याचं त्याला मनस्वी दु:ख झाले. तिकडे दशरथाने जिगदीक्षा घेतली आणि तोही जंगलात निघून गेले असल्याची वार्ताही रामाने हनुमानाला सांगितली होती. कैक्रयीने आपल्या मुलासाठी जरी एवढा खटाटोप केलेला होता तरी श्री भरताने रामाची भेट घेऊन अत्यंत व्यथित हृदयाने आईची चूक त्यांच्या नजरेस आणून दिली. पण रामाचं जितकं प्रेम कौसल्येवर होतं त्याहून अधिक जास्त कैक्रीवर होतं. इतकं की राम आपल्या कौसल्या मातेला कैक्रयी माता म्हणून संबोधित असत. पित्यानं दिलेली वचने पालन करण्यासाठीच नव्हे तर ज्या कैक्रयीवर आपले अतोनात प्रमे आहे त्या आईच्या मंगल इच्छेपूर्तीसाठी वनांत गेला होता. रघुकुलांतील मानव मनाने किती उंच असतो याची प्रचीती जगाला आणून देण्याचे काम आपले आहे असे रामाला वाटत होते, ज्याला ध्येये असतात त्यालाच दु:खे असतात. त्या दु:खाशी एकरुप होण्यांत मानवाची उंची वाढते. भौतिक उपभोगाच्या विपुल साधनसामुग्रीनं मानवाची उंची ठरत नाही. रामाच्या भरतानं राम परत परत येत नाही. म्हणून रामानं दिलेल्या तृणांच्या पादुका गादीवर ठेवून राज्य चालविलं. हे सारं सारं रामानं जेव्हां हनुमानाला सांगितलं तेंव्हा हनुमान गहिवरला होता. संपूर्ण रघुकुल म्हणजे आदर्श आहे असं वाटलं होतं. म्हणूनच रामाच्या संबंधी त्याच्या मनात प्रेम निर्माण झालं होतं. रामाची भक्तीहि हनुमानावर बसली होती. राम आणि लक्ष्मण हे आपलेच भाऊ आहेत अशी भावना त्याच्या मनांत निर्माण झाली होती. आणि म्हणूनच सर्व शक्ती पणाला लावून रामाची आणि सीतेची भेट घडवून आणावी हीच एकमेव इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली होती.